MHAU080000412026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२२/२०२६.

साखराबाई व इतर वि. महाराष्ट्र शासन

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार क्र.१ ते ९ यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मयत तोताराम धोंडीबा दांडगे यांचे दिनांक १८.०८.१९९९ रोजी मौजे बाळापूर, ता. सिल्लोड येथे निधन झालेले आहे. तसेच, मयत तोताराम धोंडीबा दांडगे यांची पत्नी मयत राहिबाई तोताराम दांडगे यांचे दिनांक २७.१२.२०१३ रोजी निधन झालेले आहे. तसेच, मयत तोताराम धोंडीबा दांडगे यांचा एक मुलगा मयत नामे एकनाथ तोताराम दांडगे यांचे दिनांक २४.११.२०१७ रोजी निधन झालेले आहे.

३. अर्जदार क्र.१ ते ५ ह्या मयत तोताराम धोंडीबा दांडगे यांच्या मुली आहे. अर्जदार क्र. ५ हा मुलगा आहे. तर, अर्जदार क्र. ६ ही मयत एकनाथ तोताराम दांडगे याची पत्नी तर मयत तोताराम धोंडीबा दांडगे यांची सून आहे. अर्जदार क्र. ७ ते ९ हे मयत एकनाथ तोताराम दांडगे याचे मुले तर मयत तोताराम धोंडीबा दांडगे यांचे नातवंड आहे. अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही असे अर्जामध्ये नमूद केले आहे.

४. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसूल कामासाठी मयताचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता त्यांनी प्रस्तूत अर्ज दाखल करुन मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

५. अर्जदारांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र.८ यांचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१० वर अभिलेखावर दाखल करुन अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. आणि नि.क्र.११ वरती पुरसिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ९ यांच्या आधारकार्डांच्या प्रती, मयतांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती, यादीसोबत दाखल केल्या आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दैनिक "**मराठवाडा केसरी**" मध्ये दिनांक

१९.०१.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले, मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांनी वर नमूद कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने अभिलेखावर सादर केलेली आहेत. प्रस्तूत आदेश करतेवेळी अर्जदारांनी वर नमूद मूळ कागदपत्र न्यायालयात सादर केली आहेत. सदर सर्व कागदपत्रांची या न्यायालयाने पडताळणी व अवलोकन केले आहे. अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांच्या अवलोकनावरुन हे स्पष्ट होते की, अर्जदार क्र.१ ते ९ हे मयताचे औपचारिक कायदेशीर वारसदार आहेत.

६. अर्जदारांनी ते मयताचे वारस असून त्यांनी शासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची विनंती केलेली आहे. मुंबई अधिनियम १८२७ VIII चा हेतू हा मयताच्या वारसांची ओळख पटविण्याचा असून सदर अधिनियमाच्या नियम २ व ३ प्रमाणे वारसांच्या मागणीस कोणाचाही आक्षेप नसल्यास त्यांच्या हक्कात न्यायालय वारस प्रमाणपत्र देवू शकते. प्रस्तूत वारस प्रमाणपत्र केवळ संबंधित मयताचे औपचारिक कायदेशीर वारस म्हणून वारसांची ओळख निश्चित करण्यासाठी जारी केले जाते. या प्रमाणपत्राद्वारे मयतांच्या जंगम आणि स्थावर मालमत्तेमधील मालकी हक्क घोषित केले जात नाहीत.

७. अर्जदारांनी दाखल केलेली कागदपत्रे व त्यांच्या साक्षी पुराव्यावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदारांच्या कथनानुसार मयताचे निधन झालेले असून त्यांना अर्जदारांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांच्या मागणीस दिलेल्या कालावधीमध्ये कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांची अर्जातील कथने व त्यांचा पुरावा फेटाळण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार हे मयताचे औपचारिक कायदेशिर वारस असल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे मुंबई अधिनियम कायद्याचे कलम २ व ३ प्रमाणे अर्जदारांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मुंबई अधिनियम कायदा १८२७ प्रमाणे अर्जदार क्र.१ ते ९ यांच्या नावे ते **मयत तोताराम धोंडीबा दांडगे** यांचे औपचारिक कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्राचा उपयोग भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील उत्तराधिकारी प्रमाणपत्र संबंधीत तरतुदी तसेच महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क कायदा, १९५९ ची सूची १, अनुच्छेद ११ प्रमाणे आर्थिक लाभ मिळविण्यासाठी करता येणार नाही.

४. अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर प्रमाणपत्रावरुन मिळविलेल्या मालमत्तेची पूर्ण व सत्य आणि प्रमाणीत यादी दिवाणी नियमावलीच्या प्रकरण १४ चे परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे आदेशापासून सहा महिन्यांच्या आत दाखल करावी.

17/03/26

ठिकाण :- सिल्लोड.
दिनांक : १७.०३.२०२६.

**(ए. एच. तट्टु)**
३रे सह दिवाणी न्यायाधीश क, स्तर,
सिल्लोड.